5.1.1

(3)

प्रेस नोट

केंद्र शासनाचे अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत सामाजिक न्याय व

(3)

श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद.

// सूचना //

दिनांक :- १६/०४/२०२४

महाविद्यालीयातील सर्व विद्यार्थिनिंना सुचित करण्यात येते की, सत्र २०२३-२०२४ मध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थिनींना सूचित करण्यात येते की, ज्यानी अद्यापही आपले शिष्यवृत्ती, फ्रिशिप व ईबीसी चे अर्ज भरले नाही त्यांनी दिनांक:- ३०/०४/२०२४ पर्यंत Mahadbt. Maha. gov.in या वेबसाईड वर भरुन त्याची हार्डकापी ग्रंथालयात श्री प्रमोद मुकिरवार यांच्याकडे जमा करावी.

टिप:- प्राध्यापकांनी आपल्या ग्रूप वर विद्यार्थिनिंना सूचना टाकावी.

Room No. 107 20.04.2024

Room-310 20.4.2024

off Principal
Smt.Vatsalabai Naik Mahila
Mahavidyalaya.Pusad

सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, यवतमाळ

INWARD NO 267
OUTWARD NO
Date 13/01/2024

Principal
Smt.Vatsalabai Naik Mahila
Mahavidyalaya,Pusad

प्रेस नोट

केंद्र शासनाचे अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक 17 मार्च, 2022 व 07 जुलै, 2023 या शासन निर्णयात नमुद केल्यानुसार अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना केंद्र शासनाची 60% हिस्साची रक्कम महाडीवीटी प्रणालीव्दारे विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा झाल्या नुसार विद्यार्थ्यांनी त्यांना अनुज्ञेय असलेल्या निर्वाह भत्त्याची रक्कम वजा करुन उर्वरीत शिक्षण शुल्क , इतर ना परतावा शुल्काची रक्कम संबंधित महाविद्यालयास 07 दिवसांच्या आत जमा करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीची सन 2021-22 व 2022-23 वर्षातील केंद्र शासनाची 60% रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे. करिता ज्या विद्यार्थ्यांच्या खात्यात अशी रक्कम जमा झाली आहे अथवा काही दिवसात जमा होणार आहे. अशा विद्यार्थ्यांनी जमा रकमेमधून निर्वाह भत्त्याची रक्कम वजा करुन उर्वरित रक्कम महाविद्यालयात जमा करावी. या प्रमाणे कार्यवाही न केल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थी तसेच त्यांच्या पालकांची राहील, याची नोंद घ्यावी.

असे आवाहन श्री. भाऊराव रामसिंग चव्हाण, सहाय्यक आयुक्त, यवतमाळ यांनी केले आहे.

सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, यवतमाळ

INWARD NO 267
OUTWARD NO
Date 13/01/2024

Principal
Smt.Vatsalabai Naik Mahila
Mahavidyalaya,Pusad

13/1/24

विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे सन २०१८-१९ ते २०२१-२२ या कालावधीतील शिष्यवृत्ती / फ्रिशीप योजनेंतर्गत प्रलंबित अर्ज निकाली काढण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग
शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२३/प्र.क्र.११/शिक्षण-१
मोती महल, २ रा मजला, १९५ ,जे. टाटा रोड, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०
दिनांक : २४ मे, २०२३.

वाचा:- १. शासन निर्णय क्र.साप्रवि-मातंस-२०१८/प्र.क्र.१३८/से-१/३९, दि.१२.१०.२०१८
२. शासन परिपत्रक क्र.इबीसी-२०१७/प्र.क्र.७३/शिक्षण, दिनांक २४ मे, २०१९
३. शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.४२/शिक्षण दिनांक २७ नोव्हेंबर, २०१९.

प्रस्तावना:-

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान), दिनांक १२.१०.२०१८ अन्वये शासनाच्या विविध विभागांकडून देण्यात येणारे लाभ, आर्थिक सहाय्य आणि सेवा यांचे उद्देशीय व पात्र लाभार्थ्यांना वितरण करण्यासाठी थेट लाभ हस्तांतरण (महाडिबीटी) प्रणाली ही एकमेव राज्यस्तरीय प्रणाली लागू करण्यात आली आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून इतर मागासवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागासप्रवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व व मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येतात. विभागाच्या दिनांक २६.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये शिष्यवृत्ती योजनांसदर्भातील अर्ज करण्यापासून योजनेच्या लाभाची रक्कम लाभार्थी विद्यार्थ्याच्या आधार संलग्नित बँक खात्यात जमा करण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रियेसाठी राज्यस्तरीय डीबीटी प्रणालीचा वापर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. महाडीबीटी पोर्टलद्वारे मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनांचा लाभ थेट विद्यार्थ्यांना देण्यात येतो.

सन २०१८-१९ पासून महाडिबीटी प्रणालीमार्फत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत असली तरी पोर्टलवर अर्ज करताना येणाऱ्या विविध अडचणींमुळे अनेक विद्यार्थ्यांचे विहित मुदतीत अर्ज भरता न येणे, अर्ज Auto Reject होणे, एखाद्या वर्षी अर्ज भरता न आल्यास त्या वर्षी Gap Year असे पोर्टलवर नमूद होऊन पुढच्या वर्षीचा अर्ज भरण्यास अडचण येणे अशा बऱ्याच अडचणींचा सामना विद्यार्थ्यांना करावा लागत आहे त्यामुळे पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देता येत नाही. या सर्व अडचणींचा विचार करता, सन २०१८-१९ पासून सन २०२१-२२ पर्यंत ज्या विद्यार्थ्यांना अशा अडचणी आल्या आहेत, अशां प्रकरणी निर्णय घेण्यास हा विभाग सक्षम असल्याचे माहिती व तंत्रज्ञान विभागाने अभिप्राय दिले आहेत. यास्तव विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे सन २०१८-१९ ते २०२१-२२ या कालावधीतील शिष्यवृत्ती / फ्रिशीप योजनेंतर्गत

INWARD NO
OUTWARD NO 7-4
Date 28/6/2023
Principal
Smt. Vatsalabai Naik Mahila
Mahavidyalaya, Pusad

प्रलंबित अर्ज निकाली काढण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यपद्धती लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

सन २०१८-१९ पासून सन २०२१-२२ या वर्षात ज्या विद्यार्थ्यांना महाडिबीटी प्रणालीवर फॉर्म भरण्यास अडचणी आल्या आहेत, अशा विद्यार्थ्यांना खालील अटि व शर्तीच्या अधीन राहून ऑफलाईन शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

१) ज्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीकरिता अर्ज करताना आधार नोंदणी न केल्याने महाडिबीटी प्रणालीवर अर्ज नामंजूर (Auto Reject) झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या आधार प्रमाणपत्र सादर करुन ऑफलाईन अर्ज करता येईल.

२) ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज सादर केला होता परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे महाडिबीटी प्रणालीवर सिस्टीम ॲडमीन कडून अर्ज नामंजूर (Reject) झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांना ऑफलाईन अर्ज सादर करता येईल, तथापि, कोणत्या कारणामुळे ऑनलाईन अर्ज रिजेक्ट झाला त्याची कारणमीमांसा व त्याबाबतच्या पूर्ततेसह ऑफलाईन अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

३) ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज केला आहे व सद्य:स्थितीमध्ये निधी अभावी त्यांच्या खात्यामध्ये शिष्यवृत्ती जमा झालेली नाही, अशा विद्यार्थ्यांना ऑफलाईन अर्ज सादर करता येणार नाहीत.

४) सदर ऑफलाईन अर्ज सादर करताना महाडिबीटी प्रणालीवरील नामंजूर झालेल्या अर्जाचा क्रमांक (Application ID) नमूद करणे आवश्यक आहे. सदर Application ID नमूद नसेल अशा अर्जाचा शिष्यवृत्ती मंजूरीकरिता विचार करण्यात येणार नाही.

५) ज्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन फॉर्म शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या निकषांमध्ये बसत नसल्यामुळे (उदा. उत्पन्न मर्यादा, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र इ.) नामंजूर (Reject) झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांना ऑफलाईन अर्ज सादर करता येणार नाहीत.

६) जे विद्यार्थी काही विशिष्ट कारणामुळे (महाविद्यालय बदल, शिक्षणात खंड इ.) महाडिबीटी प्रणालीवर अर्जाची नोंदणी करु शकले नाहीत, अशा विद्यार्थ्यांना कारणमीमांसासह ऑफलाईन अर्ज सादर करता येतील. तथापि, सदर प्रकरणी विद्यार्थ्यांनी नमूद केलेली कारणमीमांसा समर्पक असल्यासच शिष्यवृत्ती देय ठरणार आहे व याबाबतचा अंतिम निर्णय शासनाचा असणार आहे.

७) सदर ऑफलाईन अर्ज सादर करताना महाडिबीटी प्रणालीवर लागू असलेले सर्व निकष संबंधित विद्यार्थ्यांना लागू राहतील. त्याचप्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे नोंदविणे आवश्यक राहील (उदा. उत्पन्न मर्यादा, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र, कॅप राऊंड प्रमाणपत्र इ.).

८) ज्या कोर्सचे मॅपिंग शिष्यवृत्तीसाठी महाडिबीटी प्रणालीवर आहेत, अश्याच कोर्सचे शिष्यवृत्ती ऑफलाईन अर्जासाठी लागू राहील. महाडिबीटी प्रणालीवरील मॅपिंग न. झालेल्या कोर्सची शिष्यवृत्ती ऑफलाईन पध्दतीने सादर झाल्यास अश्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

९) एकाच विद्यार्थ्याचे ऑनलाईन व ऑफलाईन अर्ज सादर होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी तसेच याप्रकरणी ऑनलाईन अर्ज भरताना स्वतःचे प्रतिज्ञापत्र संबंधित विद्यार्थ्याने द्यावे. सदर प्रकरणी दोन्ही प्रकारात विद्यार्थ्याने अर्ज सादर केलेला असल्याची बाब निष्पण झाल्यास संबंधितांवर फौजदारी कारवाई करण्यात येईल.

१०) सन २०१८-१९ पासून सन २०२१-२२ या वर्षात ज्या विद्यार्थ्यांना महाडिबीटी प्रणालीवर फॉर्म भरण्यास अडचणी आल्या आहेत, अशा विद्यार्थ्यांनी ऑफलाईन अर्ज सादर करुन त्यांना शिष्यवृत्ती देण्यामागे केवळ होतकरु व गुणवंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये असा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे उपरोक्तप्रमाणे विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामार्फत संबंधित सहाय्यक आयुक्त/सहाय्यक संचालक, यांचेकडे शिष्यवृत्तीकरिता ऑफलाईन अर्ज सादर करण्याचा कालावधी - **दि.२५.०५.२०२३ ते दि. २४.०६.२०२३ इतका असेल.**

११) **दि.२४.०६.२०२३** नंतर येणाऱ्या कोणत्याही अर्जांना शासनाकडून मंजूरी देण्यात येणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

१२) संबंधित सहाय्यक आयुक्त/ सहाय्यक संचालक यांनी फॉर्मची तपासणी करुन आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव शासनास सादर करण्याचा कालावधी :- **दि.२५.६.२०२३ ते १५.०७.२०२३**

१३) महाईस्कॉल प्रणालीवरील नोंदणी झालेले प्रलंबित तसेच सन २०११-१२ ते सन २०१७-१८ या वर्षातील ऑफलाईन पद्धतीने स्वीकारण्यात आलेले शिष्यवृत्ती / फ्रिशीप अर्ज निकाली काढण्यासाठी विभागाकडून वेळोवेळी परिपत्रक/ शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्या सर्व सूचना सदर प्रकरणीही लागू राहतील.

१४) ऑफलाईन मान्यतेकरिता प्राप्त होणाऱ्या अर्जांचे प्रकरणी ऑनलाईन शिष्य देण्यात आलेली नाही याची खातरजमा संबधित सहाय्यक आयुक्त/ सहाय संचालक यांनी करुन घेणे आवश्यक राहील. शिष्यवृत्ती दोनदा अदा करण्य आल्याचे निदर्शनास आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित सहाय्यक आयुक्त सहाय्यक संचालक यांची राहील.

अश्या प्रकारे विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणाऱ्या सन २०१८-१९ ते २०२१-२२ या वर्षातील शिष्यवृत्तीचे ऑफलाईन अर्जाची छाननी करून सर्व संबधित सहाय्यक आयुक्त/ सहाय्यक संचालक यांनी सदरचे अर्ज विहित अटि व शर्तीच्या पुर्ततेसह दि.१५.०७.२०२३पर्यंत शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची दक्षता घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०५२५१६०६३०६७३४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SIDDHARTH AMRUTRAO ZALTE

Digitally signed by SIDDHARTH AMRUTRAO ZALTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=OTHER BACKWARD BAHUJAN WELFARE DEPARTMENT, [illegible]
Date: 2023.05.25 16:07:56 +05'30'

(सिध्दार्थ झाल्टे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल महोदयांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई.
४) मा. मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव (वित्त),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
९) संचालक लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.
१०) प्रादेशिक उपसंचालक/प्रादेशिक उपायुक्त (सर्व)
१) सहाय्यक आयुक्त/सहाय्यक संचालक सर्व)
२) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४) निवासी लेखापरिक्षक अधिकारी, मुंबई.
५) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व).
६) विभागातील सर्वसह सचिव / उप सचिव / अवर सचिव, मंत्रालय, मुंबई
७) कार्यासन (व्यय-१४) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) निवडनस्ती- शिक्षण-१.

अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत केंद्र शासनाने सन २०२०-२१ ते २०२५-२६ या कालावधीकरीता जारी केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचना राज्यात लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः भासशी-२०२१/प्र.क्र.१५६/शिक्षण-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ७ जुलै, २०२३

वाचा :-

१) शासन निर्णय, सा.न्या.व वि.स.वि., क्र. इबीसी-२०११/प्र.क्र.४/शिक्षण-१, दि.२.८.२०११

२) शासन शुध्दीपत्रक, सा.न्या.व वि.स.वि.,क्र.इबीसी-२०११/प्र.क्र.४/शिक्षण-१, दि.१८.९.२०१८

३) सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार यांचेमार्फत माहे मार्च, २०२१ मध्ये निर्गमित केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचना.

४) शासन निर्णय, सा.न्या.व वि.स.वि., क्र. भासशी -२०२२/प्र.क्र.७४/शिक्षण-१, दि.१७.३.२०२२

प्रस्तावना :-

अनुसूचित जाती प्रवर्गातील मुला-मुलींनी उच्च शिक्षण घेणे, त्यांच्या गुणवत्तेत वाढ करणे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श घेऊन उच्चविद्याविभुषित होणे, हा उद्देश ठेऊन अनुसूचीत जाती (नवबौध्दासह) विद्यार्थ्याकरीता भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना सन १९५९-६० पासून राबविण्यात येत आहे. सदर योजनेअंतर्गत अनुसूचीत जाती (नवबौध्दासह) प्रवर्गातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता दिला जातो व संबंधीत शैक्षणीक संस्थेस शिक्षण फी व परीक्षा फी अदा केली जाते. या योजनेअंतर्गत दिनांक १८.०९.२०१८ च्या शासन निर्णयान्वये पालकांची उत्पन्न मर्यादा २.०० लाखावरून २.५० लाख करण्यात आलेली आहे.

२. केंद्र शासनाने माहे मार्च, २०२१ मध्ये निर्गमीत केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांमधील तरतूदीनुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सुधारीत निधी वितरण कार्यपध्दती राज्यभरात अवलंबवयाची आहे. त्याचबरोबर केंद्र शासनाच्या दिनांक ०१.११.२०२१ च्या पत्रान्वये सूचित केल्याप्रमाणे सुधारीत वितरण कार्यपध्दतीचा राज्यात अवलंब न केल्यास सदरहू शिष्यवृत्ती योजनेंतर्गत राज्य शासनास अनुज्ञेय असलेले केंद्रीय अनुदानाची (केंद्र हिस्सा ६०%) अदायगी करता येणार नाही. तसेच त्या त्या आर्थिक वर्षात प्राप्त होणारे केंद्रीय अनुदान अखर्चित राहिल्यास पुढील आर्थिक वर्षात खर्च करणेसाठी पुनर्विनियोजन करता येणार नाही असे देखील सूचित करण्यांत आलेले आहे. सदर बाब विचारात घेता केंद्र शासनाच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या माहे मार्च, २०२१ मध्ये निर्गमित केलेल्या सन २०२०-२१ ते २०२५-२६ साठीच्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांमधील निधी वितरणाशी संबंधीत मुद्दा क्र.१०.१, ११.१ व ११.२ पुरता मर्यादीत शासन निर्णय दिनांक १७.३.२०२२ रोजी विभागामार्फत निर्गमीत करण्यात आलेला असून त्यान्वये भारत सरकार पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत केंद्र-राज्य हिश्श्याचे सूत्र स्विकारण्यात आले आहे व

त्याचबरोबर केंद्र शासनाच्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांमधील शिष्यवृत्तीच्या वितरण प्रणालीस देखील मान्यता देवून ती स्विकारण्यात आलेली आहे.

३. सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार यांनी अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सन २०२०-२१ ते २०२५-२६ या कालावधीकरीता माहे मार्च, २०२१ पासून सुधारीत मार्गदर्शक सूचना जारी केलेल्या आहेत सदर मार्गदर्शक सूचना राज्यात लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

उपरोक्त प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार यांनी अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सन २०२०-२१ ते २०२५-२६ या कालावधीकरीता माहे मार्च, २०२१ पासून जारी केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचना, सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमुद ठळक मुद्यांसह राज्यात लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरहू योजनेसाठी येणारा खर्च मागणी क्र. एन-३ (०४) शिष्यवृत्ती आणि विद्यावेतने, (०४) (१६) भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, (केंद्रपुरस्कृत १०० टक्के), (कार्यक्रम), ३४, शिष्यवृत्त्या/विद्यावेतने, **(लेखाशीर्ष- २२२५ ०४९५)** मागणी क्र.एन-३(०४) शिष्यवृत्त्या आणि विद्यावेतने, (०४) (०१) भारत सरकारच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्त्या (कार्यक्रम) ३४, शिष्यवृत्त्या/विद्यावेतने लेखाशीर्ष (२२२५ ०३५२) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यांत येऊन त्याखाली केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२३०७०७१७१७१६६७२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SOMNATH NAMDEO BAGUL

Digitally signed by SOMNATH NAMDEO BAGUL

(सो.ना.बागुल)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
२. अपर मुख्य सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
४. मा.मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.राज्यमंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

७. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.

९. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे

१०.उपसचिव (अर्थसंकल्प)/(विघयो), सा.न्या.व वि.स.वि., मंत्रालय, मुंबई

११.उपसचिव (शिक्षण-१), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई

१२.सर्व सहायक आयुक्त / प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, पुणे

१३.निवडनस्ती (का.शिक्षण-१)

88

11/7/2023

अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सन २०२०-२१ ते २०२५-२६ या वर्षांकरीता केंद्र शासनाने जारी केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचना लागू करण्याबाबत

(शासन निर्णय क्रमांक : भासशी-२०२१/प्र.क्र.१५७/शिक्षण-१, दिनांक : ७ जुलै,२०२३ सोबतचे)

परिशिष्ट

१. राज्य शासनाच्या महाडीबीटी पोर्टल अंतर्गत सदर योजना राबविण्यांत येत असून याबाबत राज्य शासनाच्या दि. ८ जानेवारी, २०१९ च्या शासन निर्णयानुसार महाविद्यालयांसंबंधीत मान्यता, नोंदणी (NAAC/ NBA accreditation), अभ्यासक्रमाची मान्यता, महाविद्यालयांची मान्यताप्राप्त विद्यार्थी क्षमता, अभ्यासक्रमाची मान्यता प्राप्त शुल्क रचना इत्यादी सर्व बाबींची पडताळणी व खातरजमा करुन संबंधित शैक्षणिक विभाग (उदा. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, कृषी विद्यापीठे, राज्य शिक्षण शुल्क समिती इ.) व तत्सम सक्षम प्राधिकृत यंत्रणेने महाडीबीटी प्रणालीमध्ये समावेश करावयाची जबाबदारी निश्चित करण्यांत आली आहे. सामाजिक न्याय विभागांतर्गत केवळ समाजकार्य महाविद्यालयांबाबतच उपरोक्तबाबींची पडताळणी व खातरजमा करुन प्रणाली मध्ये समावेश करावयाची जबाबदारी विभागाची राहील.

२. विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष हजेरीबाबतची अट शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून अवलंबविण्यात येत आहे.

३. सर्व महाविद्यालयांनी त्यांचा प्रत्येक शैक्षणिक वर्षाचा वार्षीक लेखापरिक्षण अहवाल राज्य शासनास सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांना देय असणा-या सर्व बाबी लेखापरिक्षण अहवाल सादर करेपर्यंत स्थगीत ठेवण्यात येतील.

४. सदर योजना ही सुधारीत नियमावलीतील अ.क्र. ४.२ मध्ये नमुद सर्व संवर्गातील शैक्षणीक संस्थांना अ.क्र. ५.९ मध्ये नमुद तसेच नियमावलीतील इतर अटी शर्थीची पुर्तता करीत असलेल्या संस्थांना लागु करण्यात येत आहे.

५. **विविध शैक्षणीक उपक्रमाव्दारे देण्यात येणा-या शिक्षण पध्दतीमध्ये वयोमर्यादेची अट ठेवण्यात आलेली नाही. सदर बाब विचारात घेता एक अभ्यासक्रम – एक शिष्यवृत्ती असे धोरण स्विकारण्यात येत आहे.**

६. सद्यस्थितीत स्वतंत्र ऑनलाईन अभ्यासक्रम राबविणेबाबत शासनाच्या कोणत्याही विभागाचे धोरण निश्चित झालेले नाही. सबब ऑनलाईन शिक्षण राबविणेबाबत संबंधीत शैक्षणिक विभागांचे धोरण निश्चित झाल्यानंतरच ऑनलाईन अभ्यासक्रमांचा समावेश करण्यांत येईल. परंतू सदर योजनेचा लाभ केवळ राज्य शासनाची मान्यता प्राप्त विद्यापीठे / केंद्रीय विद्यापीठांतर्गत दुरस्थ व सलग शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अनुज्ञेय राहील.

७. योजनेच्या लाभाचे वितरण प्राधान्याने आधारसंलग्नीकृत बँक खाते असलेल्या लाभार्थ्यांनाच देण्यांत यावे.

८. ज्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख व त्यापेक्षा कमी आहे अशा सर्व विद्यार्थ्यांना सदर योजना अनुज्ञेय राहिल. मात्र याकरीता राज्य शासनाने खालील प्रमाणे

प्राधान्यक्रम निश्चित करुन लाभार्थ्यांची निवड करणे आवश्यक आहे.

अ) सामाजिक आर्थीक सर्वेक्षण, २०११ (SECC-२०११) मधील वंचित घटकांसाठी निर्धारीत केलेल्या एकूण ७ निकषांपैकी किमान ३ वा त्यापैकी अधीक निकषांची पुर्तता करणा-या अनुसूचित जाती प्रवर्गातील कुटुबातील विद्यार्थी.

आ) अनुसूचित जाती कुटुंबातील एक किंवा दोन्ही पालक निरक्षर असलेल्या कुटुंबातील विद्यार्थी.

इ) राज्य शासनाच्या मान्यताप्राप्त शाळा, नगरपरिषद, महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या मान्यताप्राप्त शाळांमधून इ.१० वी उत्तीर्ण अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थी.

तसेच या प्रकारचे निवडीचे प्राधान्यक्रम अवलंबण्याकरीता जिल्हास्तरावरील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयांतर्गत यंत्रणा चालू शैक्षणिक वर्षापासून नव्याने कार्यरत करण्याबाबत आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी याबाबत पुढील कार्यवाही करावी.

९. विद्यार्थ्यांना प्रवेश घेताना वा शिष्यवृत्तीसाठी अर्ज करताना येणा-या अडचणी विचारात घेता व याबाबतची कार्यवाही विहीत वेळेत पुर्ण होण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हास्तरावर जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालय व सहायक आयुक्त कार्यालय तसेच प्रादेशिक उपायुक्त कार्यालय आणी आयुक्तालय स्तरावर विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती योजनांची माहीती देणे व त्यासंबधात उद्भवणा-या अडचणींचे निराकरण करण्यासाठी संबंधित कार्यालयातील उपलब्ध कर्मचा-यांमधूनच एका कर्मचा-याची समुपदेशक म्हणून संबंधीत कार्यालय प्रमुखांनी नियुक्ती करावी.

१०. सदर योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना द्यावयाच्या निर्वाह भत्त्याचे सुधारीत दर पुढीलप्रमाणे आहेत :-

गट	वार्षिक निर्वाह भत्ता (रुपये) (वसतीगृहात राहणारे विद्यार्थी)	वार्षिक निर्वाह भत्ता (रुपये) (वसतीगृहात न राहणारे विद्यार्थी)
गट-१	१३,५००	७,०००
गट-२	९,५००	६,५००
गट-३	६,०००	३,०००
गट-४	४,०००	२,५००

१) दिव्यांग लाभार्थ्यांकरीता उपरोक्त निर्वाहभत्त्यामध्ये १० टक्के अधिक दर अनुज्ञेय राहील.

२) C.A./I.C.W.A./C.S./I.C.F.A. या अभ्यासक्रमांना प्रवेशित विद्यार्थ्यांना केवळ वसतिगृहात न राहणा-या विद्यार्थ्यांचेच दर लागू राहतील.

३) दूरस्थ / ऑनलाईन शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना कोणतेही निर्वाह भत्ते लागू होणार नाहीत.

उपरोक्त दर हे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून लागू करण्यांत यावेत.

११. योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना द्यावयाच्या निर्वाह भत्त्याचे दर हे केंद्र शासनामार्फत वेळोवेळी जाहीर / निर्धारीत केलेल्या दरानुसार अद्ययावत करण्यात येतील.

१२. अनुसूचित जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांने ज्या दिवशी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला आहे त्याच दिवशी किंवा शासन जाहीर करेल त्यादिवसापर्यंत सदर योजनेकरीता ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. सद प्रक्रीयेमध्ये संबधीत महाविद्यालयाने प्रवेशीत विद्यार्थ्यांचे अर्ज त्यांनी ज्या दिवशी प्रवेश घेतलेला आहे त दिवशी ऑनलाईनरित्या भरून घेणे व त्यासंबंधीत इतर कार्यवाही करणे आवश्यक आहे. अन्यथा र भविष्यात काही अडचण निर्माण झाल्यास संबंधीत महाविद्यालयास जबाबदार धरण्यात येईल.

१३. सदर सुधारीत मार्गदर्शक सूचना या सन २०२०-२१ पासून सन २०२५-२६ पर्यंत लागू राहतो याकरिता सन २०२०-२१ या वर्षाचे केंद्रीय अनुदान निश्चित करण्याकरीता मागील तीन वर्षे (२०१७-१८ २०१९-२०) या कालावधीची सरासरी वार्षीक मागणी निश्चित करुन सन २०२०-२१ व त्यापुढील वर्षांकरी निश्चित केलेल्या मागणीच्या ५ टक्के अतिरिक्त निधी प्रत्येक वर्षी केंद्र शासनाच्या प्रोजेक्ट ॲप्रेझल कमि (PAC) यांचेकडून वार्षीक नियोजनाला मान्यता प्राप्त झाल्यावर त्या त्या वर्षात ६०: ४० या प्रमाणात निश्चित करण्यांत येईल.

१४. सदरहू शिष्यवृत्ती योजनेंतर्गत मंजूर झालेली शिष्यवृत्तीचे वितरणाबाबत शासन निर्णय दिनांक १७ मार्च,२०२२ अन्वये स्विकारण्यात आलेले पुढील सूत्र अंतीम करण्यात येत आहे. केवळ केंद्र हिश्शाची संपूर्ण रक्कम (६० टक्के) म्हणजेच महाविद्यालयाला देय असलेले सर्व प्रकारचे नापरतावा शुल्क, (शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, इतर शुल्क इत्यादी.) तसेच विद्यार्थ्यांना अनुज्ञेय निर्वाह भत्ता व इतर अनुज्ञेय शुल्क / भत्ते इत्यादी रक्कम थेट विद्यार्थ्यांच्याच आधार संलग्नीकृत बँक खात्यामध्ये जमा होणार असून सदरहू केंद्र हिस्सा विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा झाल्यानंतर विद्यार्थ्यास अनुज्ञेय असलेला निर्वाह भत्ता वजा जाता उर्वरीत महाविद्यालयास देय असलेली रक्कम विद्यार्थ्याने पुढील सात दिवसांच्या आत महाविद्यालयास जमा करणे अनिवार्य करण्यात येत आहे. परंतु सदरहू शिष्यवृत्ती योजनेंतर्गत मंजूर झालेली राज्य हिश्श्याच्या रकमेबाबत राज्य शासनाची प्रचलीत कार्यपध्दती कायम ठेवण्यात येत आहे. योजनेंतर्गत वितरीत होणारा लाभ हा केवळ डायरेक्ट बेनिफीट ट्रान्सफर (डीबीटी) व्दारेच देण्यात येणार असून त्याची अन्य कोणत्याही पध्दतीने अदायगी करण्यात येणार नाही.

१५. सदर योजनेकरीता ऑनलाईन प्रणालीवर केवळ नोंदणी करण्याकरीता, शैक्षणिक वर्षामध्ये कोणत्याही मुदत कालावधीचे बंधन नाही. लाभार्थ्याला चालू शैक्षणिक वर्ष संपेपर्यंत प्रणालीवर प्राथमिक नोंदणी करता येण्यास सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

१६. सदर योजनेचा लाभ हा डायरेक्ट बेनिफीट ट्रान्सफर (डीबीटी) व्दारेच देण्यात येणार असल्याने लाभार्थ्यांच्या अर्जाचे नुतनीकरण करण्याकरीता आधार क्रमांक असणे व ते त्यांच्या खात्यास जोडलेले असणे आवश्यक आहे. व सदरची जबाबदारी संपुर्णत: विद्यार्थ्यांची असून त्यांनी त्यांचे बँक खाते, दुरध्वनी क्रमांक आधारकार्डाशी संलग्न करणे आवश्यक आहे.

१७. प्रतीवर्षीच्या शिष्यवृत्तीच्या अर्जाचे नुतनीकरण करण्याकरीता विद्यार्थ्यांचा मागील वर्षाचा समाधानकारक प्रगती अहवाल व मागील वर्षाची किमान ७५ टक्के उपस्थिती असणे आवश्यक आहे.

१८. राज्य शासनामार्फत प्रतिवर्षी माहे एप्रिल पासून सदर योजनेचा व्यापक प्रचार व प्रसिध्दी जास्तीत जास्त खपाच्या दैनिक वृत्तपत्रातून व राज्य शासनाच्या विविध वेबसाईट / पोर्टलवरुन राज्यभरात करण्यात येईल. तसेच सदर योजनेची महाविद्यालयस्तरावरील व्यापक प्रचार व प्रसिध्दीची जबाबदारी संबंधीत महाविद्यालयांवर निर्धारीत करण्यात येत असून त्यासाठी त्यासाठी त्यांनी वेळोवेळी कार्यशाळा / शिबिरे आयोजीत करावीत.

१९. सदर योजनेच्या परिणामकारक अंमलवजावणीच्या दृष्टीने व तिचा लाभ राज्यातील शेवटच्या विद्यार्थ्यांस मिळवून देण्याच्या दृष्टीने चालू वर्षापासून सदर योजनेच्या कार्यसफलतेचे मुल्यमापन करण्याकरीता आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य यांनी राज्यातील सामाजिक परिक्षण कक्षाच्या मदतीने राज्यस्तरावर / प्रादेशिक स्तरावर स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वीत करावी. यामध्ये जिल्हयातील किमान १० टक्के महाविद्यालये अथवा विद्यार्थी यांचा समावेश असावा. सदर यंत्रणेने त्यांचा मासीक अहवाल शासनास सादर करावा.

२०. सदर योजनेचा लाभ घेणा-या कोणत्याही विद्यार्थ्यांची कोणतीही कागदपत्रे अथवा माहिती असत्य आढळल्यास तो लाभार्थी या योजनेच्या लाभापासून कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यांत येईल. त्याचबरोबर विद्यार्थ्याने ज्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला आहे तो अभ्यासक्रम त्याने पूर्ण करणे आवश्यक आहे. जर त्याने शासनाच्या परवानगी शिवाय अभ्यासक्रम अर्धवट सोडला किंवा त्या अभ्यासक्रमाचा प्रवेश रद्द केला अथवा महाविद्यालय बदलले आणि सदरहू बाब महाविद्यालयाने शासनाच्या निदर्शनास आणून दिली तर अशा परिस्थितीत लाभार्थ्याने त्या अभ्यासक्रमास घेतलेली शिष्यवृत्ती तात्काळ खंडीत करुन त्याची वसुली शासनातर्फे करण्यांत येईल. अशा परिस्थितीत लाभार्थ्याने त्या अभ्यासक्रमास घेतलेली शिष्यवृत्ती तात्काळ शासनास परत करावयाची आहे.

२१. सदरहू सुधारीत मार्गदर्शक सूचनांमध्ये काही बदल करावयाचा असल्यास त्याबाबत केंद्र शासनाचा निर्णय अंतीम राहील.

महाराष्ट्र शासन

-सामाजीक न्याय विभाग-

कार्यालय:- सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, यवतमाळ

E-mail ID /spldswo.yml@gmail.com.

जा.क्र./सआसक/यवत/भासशी / अर्ज मंजुरी 4141 /२०२३-२४ यवतमाळ दिनांक : २३.१०.२०२३

प्रति,

मा. प्राचार्य,

सर्व महाविद्यालय, जि. यवतमाळ.

विषय :- सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील महाडीबीटी या संकेतस्थळावरील भारत सरकार शिष्यवृत्ती/फ्रिशिप या योजनांचे शिष्यवृत्तीचे भरणे बाबत.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येत की, सन २०२३-२४ या शैक्षणिक सत्रातील अनु.जाती, इमाव, विजाभज ,विमाप्र मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती/राज्य शासनाची मॅट्रीकोत्तर शिक्षण फी /परिक्षा फी प्रतिपुर्ती योजना यांचे माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने तयार केलेल्या :https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर आपले महाविद्यालयात प्रवेशित योजनेस पात्र असलेल्या अनु.जाती/इमाव/विजाभज/विमाप्र प्रवर्गातील संपुर्ण विद्यार्थ्यांचे अर्ज महाडीबीटी संकेतस्थळावर लाभार्थ्यांच्या आधार क्रमांचो बँक खात्याशी (NPCI) संलग्न करुन सन २०२३-२४ चे शिष्यवृत्तीचे अर्ज भरावे. शिष्यवृत्तीचे अर्ज **११ ऑक्टोबर, २०२३** पासून भरण्याची कार्यवाही सुरु झाली आहे.

तसेच सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील अर्ज Re-apply & scrutiny of previous year i.e. २०२२-२३ will be continued. आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्यास योग्य ती मदत करण्यात यावी.

महाविद्यालय यांना येणा-या तांत्रिक अडचणी (अभ्यासक्रम न दिसणे, विद्यार्थ्यांना अर्ज भरतांना फी न दिसणे इत्यादी) अडचणी आपल्या प्रशासकीय विभागाकडुन दुर करण्यात याव्या.

आपणास या पत्राव्दारे सुचित करण्यात येते की, सन २०२३-२४ या शैक्षणिक सत्रातील पात्र विद्यार्थ्यांचे परिपुर्ण अर्ज मुळटिसीसह मंजुरी साठी ऑनलाईन या कार्यालयास सादर करावे.

INWARD NO 219
OUTWARD NO
Date 31/10/2023
Principal
Smt. Vatsalabai Naik Mahila Mahavidyalaya, Pusad

(भाऊराव रामसिंग चव्हाण)
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, यवतमाळ.

महाराष्ट्र शासन

-सामाजीक न्याय विभाग-

कार्यालय:- सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, यवतमाळ

E-mail ID spldswo.yml@gmail.com.

जा.क्र./सआसक/यवत/मासाशि / अर्ज मंजुरी / 11476 /२०२३-२४ यवतमाळ दि.२६.१०.२०२३

प्रति,

मा. प्राचार्य,

सर्व महाविद्यालय, जि. यवतमाळ.

विषय :- सन २०२२-२३ व २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील महाडीबीटी प्रणालीवर अनुसूचित जाती प्रवर्गातील प्रलंबित असलेल्या अर्जाबाबत.

संदर्भ :- मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, अमरावती यांचे पत्र क्र.१५१८ दि.२५.१०.२०२३.

महोदय,

उपरोक्त, संदर्भिय विषयान्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून महाडीबीटी प्रणालीवर खालील प्रमाणे विविध शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे.

१. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती
२. मॅट्रिकोत्तर शिक्षण फी परिक्षा फी प्रदाने
३. राजर्षी छत्रपती शाहु महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती
४. व्यावसायिक पाठ्यक्रमांशी संलग्न असलेल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना विद्यावेतन
५. व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना

दि. २५ ऑक्टोबर, २०२३ रोजीचे महाडीबीटी महाडीबीटी डॅशबोर्डचे नुसार सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील वरील योजनांचे महाडीबीटी प्रणालीवर अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे महाविद्यालय स्तरावर मोठ्या प्रमाणात अर्ज प्रलंबित असल्याचे मा. आयुक्त यांचे निदर्शनास आले आहे.

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील उपरोक्त योजनांचे अनुसूचित जाती प्रवर्गातील प्रथम वर्षाचे व नुतनीकरणाचे अर्ज भरण्यासाठी **दि.११ ऑक्टोबर, २०२३** पासून महाडीबीटी पोर्टल माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत सुरु करण्यात आलेले आहे.

दिनांक २६.१०.२०२३ रोजीचे महाडीबीटी डॅशबोर्डनुसार सन २०२२-२३ व २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील महाविद्यालय स्तरावर प्रलंबित आहे.

अ.क्र.	शैक्षणिक वर्ष	नोंदणीकृत अर्ज	महाविद्यालयाने मंजूर केलेले अर्ज	महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्ज	या कार्यालयाचे स्तरावर प्रलंबित अर्ज
१	२०२२-२३	११,७८०	९८४६	४९६	२
२	२०२१-२२	११९५०	१०,४७०	१९६	०

सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे महाडीबीटी प्रणालीवरील महाविद्यालय स्तरावरील प्रलंबित असलेले सर्व पात्र अर्ज निकाली काढणेबाबत आपणास या कार्यालयाकडुन V.C. व्दारे, लेखीपत्राव्दारे, परिपत्रकव्दारे सूचना देण्यात आलेल्या आहेत. तरी सुध्दा सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील महाडीबीटी प्रणालीवर महाविद्यालय स्तरावर अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे अर्ज मोठया प्रमाणात प्रलंबित आहे. जोपर्यंत मागील वर्षाचे विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर होणार नाही. जोपर्यंत सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील अर्ज विद्यार्थ्यांना महाडीबीटी प्रणालीवर भरता येत नाही.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, **महाडीबीटी प्रणालीवरील सन २०२२-२३ व २०२१-२२** या शैक्षणिक वर्षातील महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेले अनुसूचित जाती प्रवर्गातील सर्व पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज **दि. ३१ ऑक्टोबर, २०२३** पुर्वी निकाली काढण्यात यावेत. भविष्यात महाडीबीटी Admin कडून अर्ज Auto Reject झाल्यास अथवा Online मंजुरीची अर्ज प्रक्रिया बंद झाल्यामुळे अनुसूचित जाती प्रवर्गातील पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयीन प्राचार्य यांची राहील याची नोंद घेण्यात यावी. तसेच पात्र विद्यार्थ्यांकडुन शुल्क घेण्यात येवु नये.

वरील प्रमाणे महाविद्यालयाचे स्तरावर प्रलंबित असलेले पात्र अर्ज दिनांक **३१ ऑक्टोबर,२०२३** पुर्वी मंजुरीसाठी या कार्यालयास Online सादर करण्यात यावे.

INWARD NO 218
OUTWARD NO
Date 31/10/2023
Principal
Smt. Vatsalabai Naik Mahila Mahavidyalaya, Pusad

(भाऊराव रामसिंग चव्हाण)
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, यवतमाळ.

प्रतिलिपी:- माहितीस्तव सविनय सादर.

१. मा. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे .
२. मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, अमरावती.

सही/-
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, यवतमाळ.

महाराष्ट्र शासन

समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

दूरध्वनी क्र.२०-२६१२७५६९ ईमेल - directorsocialfare@yahoo.co.in

क्र.सकआ/शिक्षण/भासशि/का-४क/ २०२३-२४/ ५००५ दिनांक :- १५/१२/२०२३

प्रति,

१) प्रादेशिक उपायुक्त,
समाज कल्याण विभाग, सर्व

२) सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, सर्व

विषय: शै. वर्ष २०२३-२४ महाडीबीटी प्रणालीवरील योजनांची अंमलबजावणीबाबत..

संदर्भ: महाडीबीटी पोर्टलवरील दि. १५.१२.२०२३ रोजीचा रिपोर्ट

वरील विषयाच्या अनुषंगाने, आपणास अवगत आहे की, सद्यस्थितीत चालू शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता ११ ऑक्टोबर,२०२३ पासून महाडीबीटी प्रणालीद्वारे अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता भा.स.शि., फ्रीशिप, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती व व्यवसायिक पाठ्यक्रमास शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन या चार योजनांचे नविन व नुतनीकरणाच्या अर्जाची महाडीबीटी प्रणालीद्वारे स्विकृती सुरु झालेली आहे.

त्यामध्ये प्रामुख्याने भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती तसेच राज्यशासनाची शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती (फ्रीशिप) या योजनाकरिता राज्यभरात मागिल वर्षाच्या तुलनेत चालू शै.वर्ष २०२३-२४ मध्ये सद्यस्थितीत केवळ अनुक्रमे २१% व २३% अर्ज नोंदणीकृत झालेले आहेत. त्याचे विवरण खालील प्रमाणे-

महाडीबीटी प्रणालीवरील योजना	मागिल शै.वर्ष २०२२-२३ मधील नोंदणीकृत अर्ज	चालू शै. वर्ष २०२३-२४ मधील नोंदणीकृत अर्ज			टक्केवारी
		नविन अर्ज	नुतनीकरणाचे अर्ज	एकूण अर्ज	
भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती	४,३२,२१७	५२,०८९	३९,६१४	९१,७०३	२१%
शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती (फ्रीशिप)	४०,३२१	४,०५८	५,४३३	९,४९१	२३%
राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती	३०,०३७	४,६०७	२,२१३	६,८०२	२२%
व्यावसायिक पाठ्यक्रमात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन योजना	३,४९४	४१७	२४३	६६०	१८%

१) महाडीबीटी प्रणालीवर ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही शै.वर्ष २०२३-२४ करिता अर्ज नोंदणी केलेली नाही या मागील वर्षातील अर्ज त्रुटी पूर्ततेकरिता विद्यार्थी स्तरावर प्रलंबित आहे अशा अर्जदारास त्यांचा अर्ज सादर करणेबाबत महाविद्यालयाद्वारे वेळोवेळी लेखी सूचना निर्गमित कराव्यात तसेच

INWARD NO. 261
OUTWARD NO.
Date 27/12/2023

27/12/23

Principal
Smt. Vatsalabai Naik Mahila
Mahavidyalaya, Pusad

CamScanner

विहित वेळेत विद्यार्थ्याने परिपूर्ण अर्ज सादर न केल्यास सदर योजनेच्या लाभापासून अर्जदार वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील याची विद्यार्थ्यांनी दखल घ्यावी.

२) महाडीबीटी प्रणालीवरील द्वितीय, तृतीय, व चतुर्थ वर्षाकरिता शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच नुतनीकरणाच्या अर्जाकरिता प्रथम प्राधान्य देऊन सदर अर्ज निकाली काढण्यात यावेत.

३) प्रथम वर्षातील ज्या अभ्यासक्रमाचे संबंधित शैक्षणिक यंत्रणा / विभागामार्फत महाविद्यालयांचे शैक्षणिक शुल्क मंजूर झालेले आहे अशा महाविद्यालयांनी नविन अर्ज निकाली काढण्याची कार्यवाही तत्काळ करावी. त्याचप्रमाणे सदर शुल्क रचना मंजुरीस्तव प्रलंबित असल्यास संबंधित महाविद्यालयाने सक्षम यंत्रणाशी पाठपुरवा करून शुल्क रचना मंजूर करावी.

४) महाडीबीटी पोर्टल वरील महाविद्यालयस्तरावर प्रलंबित असलेल्या अर्जाबाबत सर्व दस्ताऐवजांची पडताळणी, अभ्यासक्रम शुल्क, आधार बँक लिंकस्थिती, इत्यादी बाबींची खातरजमा करून महाविद्यालयाचे क्लार्क व प्राचार्य लॉगीन मधून पुढील मंजुरीकरिता सर्व अर्ज जिल्हा कार्यालयास तात्काळ पाठवावेत.

५) महाविद्यालय स्तरावरील दुसऱ्या हप्त्यासाठी प्रलंबित असलेल्या अर्जाबाबत विद्यार्थ्यांची द्वितीय सत्राची उपस्थिती अद्यावत करून प्रलंबित अर्ज महाविद्यालयाचे क्लार्क व प्राचार्य यांच्या लॉगीनद्वारे अर्ज मंजुरीसाठी विभागास पाठवावेत. तसेच महाविद्यालय स्तरावर अर्ज प्रलंबित राहुन विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्राचार्य यांची राहील.

उपरोक्त १ ते ५ बाबींकरिता जिल्हास्तरावरुन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी त्यांच्या अधीनस्त असलेल्या महाविद्यालयांना लेखी सूचना निर्गमित कराव्यात. महाडीबीटी पोर्टलवरील दि.१५.१२.२०२३ अहवालानुसार राज्यभरात अनुसूचित जाती प्रवर्गातील नोंदणीकृत झालेल्या अर्जांपैकी विद्यार्थीस्तर, महाविद्यालयस्तर व जिल्हास्तरावर अद्यापही मोठ्या प्रमाणात अर्ज प्रलंबित आहेत.

चालू शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील अर्ज निकाली काढण्यास कोणत्याही स्वरुपाची तांत्रिक अडचण उद्भवत असल्यास संबंधित अर्जदार, महाविद्यालय, तसेच सहाय्यक आयुक्त स्तरावरील कर्मचारी / अधिकारी यांनी प्रथमतः महाडीबीटी पोर्टल वरील तक्रार / सूचना (Grievance / Suggestions) येथे येणाऱ्या अडचणीच्या स्क्रीनशॉट सह तक्रार नोंद करणे आवश्यक आहे. तद्नंतर तक्रार नोंदविलेल्या दोन दिवसानंतर हि तांत्रिक अडचण उद्भवत असल्यास राज्यशासनाच्या महाआयटी - तांत्रिक कक्षाच्या खालील समन्वयकांशी संपर्क साधून आपल्या अडचणीचे तात्काळ निराकरण करुन घेणे आवश्यक आहे.

अ.क्र.	नाव	मोबाईल क्र	ई मेल आयडी
१	श्री.आमेय सारवणकर	+९१ ९८७००४२१२१	Ameya.Sarvankar@mahait.org
२	श्री.अभिजित देवळे	+९१ ८४२१६ ७८८७०	Abhijit.Deole@mahait.org
३	श्री. स्वप्नील जगताप	+९१ ८४२१६७८८७०	Swapnil.Jagtap@mahait.org

तथापि, उपरोक्त नमूद केलेली अर्जस्थिती लक्षात घेता केंद्रशासन तसेच राज्यशासनस्तरावरुन तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. तसेच आपल्या या दिरंगाईमुळे विभागाची प्रतिमा मलीन होत असून यामुळे लाभार्थ्यांमध्ये रोष निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे.

तेव्हा अनुसूचित जातीच्या पात्र लाभार्थ्यांना सदर योजनांचा लाभ विहित वेळेत मंजूर करण्याची सर्वस्वी जबाबदारी आपली आहे. तसेच केंद्रशासनाच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांनुसार चालू शैक्षणिक वर्षापासून राज्य शासनस्तरावरुन पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करुन त्यांना अनुज्ञेय असलेल्या एकूण शिष्यवृत्ती रक्कमेपैकी राज्यशासनाचा ४०%चा हिस्सा प्रथमतः

करणे आवश्यक आहे .राज्य हिस्सा वितरीत केल्यानंतरच केंद्रशासनामार्फत त्यांच्या स्तरावरुन केंद्र ा ६०% वितरीत होणार आहे.

उपरोक्त सर्व बाबी तसेच चालू आर्थिक वर्ष संपुष्टात येण्यास केवळ १२० दिवसांपेक्षाहि कमी ावधी राहिला असल्याने आपल्यास्तरावरुन उपरोक्त सर्व कार्यवाही तात्काळ करणे आवश्यक आहे, ती आपण सर्वांनी गांभिर्यपूर्वक नोंद घ्यावी.

(प्रमोद जाधव)
सहआयुक्त (शिक्षण),
समाज कल्याण आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत:- माहितीस्तव सविनय सादर

१) मा.सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई ३२ यांचे स्वीय सहाय्यक

२) मा.आयुक्त, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य पुणे यांचे स्वीय सहाय्यक

पत :- माहिती तथा कार्यवाहीस्तव सादर

प्रकल्प व्यवस्थापक, महाडीबीटी तांत्रिक कक्ष महाआयटी कार्पोरेशन मुंबई शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता महाडीबीटी प्रणालीवरील अर्जाबाबत उद्भत असलेल्या तांत्रिक अडचणी तात्काळ दूर करण्यात याव्यात.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय विभाग
कार्यालयः- सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, यवतमाळ
E-mail ID spldswo.yml@gmail.com.

जा.क्र./सआसक/यवत/भासशि/ 612 /2023-24 यवतमाळ दिनांक :- 28.02.2024

प्रति,
प्राचार्य,
सर्व महाविद्यालये,
जिल्हा- यवतमाळ.

विषयः- शैक्षणिक वर्ष 2023-24 मधील शिष्यवृत्ती योजनांच्या ऑनलाईन अर्जाबाबत.

संदर्भः-1. मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि. 27 फेब्रुवारी 2024 रोजी व्हीडीओ कॉन्फरन्स् मध्ये दिलेल्या सुचना.

2. मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, विभाग, अमरावती यांच्या दि. 28 फेब्रुवारी 2024 रोजी व्हीडीओ कॉन्फरन्स् मध्ये दिलेल्या सुचना.

उपरोक्त् विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2023-24 या शैक्षणिक वर्षातील अनुसूचित जाती या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी प्रणालीवर खालील प्रमाणे योजना राबविण्यात येतात.

3. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती
4. शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क प्रदाने
5. राजर्षी शाहु महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती
6. व्यावसायिक पाठयक्रमांशी संलग्न असलेल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना विद्यावेतन
7. व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना.

सन 2023-24 या शैक्षणिक वर्षातील उपरोक्त् योजनांचे प्रथम वर्षाचे व नुतनीकरणाचे अर्ज भरण्यासाठी माहे 11 ऑक्टोबर, 2023 पासून महाडीबीटी पोर्टल माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत सुरु करण्यात आलेले आहे. मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि. 28 फेब्रुवारी 2024 व मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, अमरावती यांनी दि. 28.02.2024 रोजी व्हीडीओ कॉन्फरन्स् मध्ये दिलेल्या सुचना नुसार शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्याचे प्रमाण कमी असल्याने नाराजी व्यक्त् केली आहे.

अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी 7656 अर्जाची नोंदणी केली असुन त्यापैकी महाविद्यालयाने केवळ 3598 अर्ज मंजुर केले आहे. महाविद्यालयस्तरावर 3258 अर्ज प्रलंबित आहे.

जे महाविद्यालय अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित ठेवीत आहेत व लवकर मंजूर करीत नाही अशा महाविद्यालयांना अनुसूचित जातीचे लाभार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित राहिल्यास ॲक्ट्रासिटी ॲक्ट अंतर्गत कार्यवाही करण्यांत येईल अशा सुचना देण्यात आल्या आहेत.

महाविद्यालयांनी विद्यापीठ व शिक्षण शुल्क समिती यांचेकडील शुल्क मंजूर होणे ही कार्यवाही संबधित यंत्रनेची आहे. फी मंजुरी बाबत तात्काळ विद्यापीठाकडे संपर्क साधून फी मंजुर करुन घ्यावी.

आपणास या पत्राव्दारे सुचित करण्यात येते की, आपलेस्तरावरुन विद्यार्थ्याकडुन शिष्यवृत्तीचे अर्ज भरुन घेण्यात यावे व पात्र विद्यार्थ्यांचे परिपुर्ण अर्ज मुळटिसीसह मंजुरीसाठी त्वरीत ऑनलाईन सादर करणात यावे. शिष्यवृत्ती अभावी विद्यार्थी वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी. तसेच त्रुटीतील अर्ज विद्यार्थी लॉगिनला परत करण्यात यावे. पात्र विद्यार्थ्यांकडुन शुल्क घेण्यात येवू नये. याची नोंद घ्यावी.

INWARD NO 310
OUTWARD NO
Date 29/2/2024

Principal
Smt. Vatsalabai Naik Mahila

(भाऊराव रामसिंग चव्हाण)
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, यवतमाळ

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय विभाग
कार्यालय:- सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, यवतमाळ
E-mail ID spldswo.yml@gmail.com.

जा.क्र./सआसक/यवत/भासशि/ 613 /2023-24 यवतमाळ

दिनांक :- 28.02.2024

प्रति,
प्रकल्प अधिकारी
बार्टी, पुणे जि. यवतमाळ.

विषय:- शैक्षणिक वर्ष 2023-24 मधील शिष्यवृत्ती योजनांच्या ऑनलाईन अर्जाबाबत.

संदर्भ:-1. मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि. 27 फेब्रुवारी 2024 रोजी व्हीडीओ कॉन्फरन्स मध्ये दिलेल्या सुचना.
2. मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, विभाग, अमरावती यांच्या दि. 28 फेब्रुवारी 2024 रोजी व्हीडीओ कॉन्फरन्स मध्ये दिलेल्या सुचना.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि. 27 फेब्रुवारी 2024 व मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, अमरावती यांनी दि. 28.02.2024 रोजी व्हीडीओ कॉन्फरन्स मध्ये दिलेल्या सुचना नुसार शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्याचे प्रमाण कमी असल्याने नाराजी व्यक्त केली आहे.

अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी 7656 अर्जाची नोंदणी केली असुन त्यापैकी महाविद्यालयाने केवळ 3598 अर्ज मंजुर केले आहे. **महाविद्यालयस्तरावर 3258** अर्ज प्रलंबित आहे.

त्या अनुषंगाने यवतमाळ जिल्हयातील आपल्या अधिनस्त असलेले समतादुत व तालुका समन्वयक यांना तालुक्यातील सर्व महाविद्यालयांना भेटी देण्याचे कळविण्यात येवून महाविद्यालयाशी संपर्क करुन महाविद्यालयांना विद्यार्थ्याकडुन शिष्यवृत्ती अर्ज भरुन घेण्याबाबत व महाविद्यालयास्तरावर प्रलंबित असलेले अर्ज अनुसूचित जाती प्रवर्गाचे शिष्यवृत्तीचे/फ्रिशिपचे अर्ज ऑनलाइन प्रणालीवर भरुन या कार्यालयात ऑनलाईन सादर करण्याबाबत महाविद्यालयांना सूचित करण्यात यावे. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयात सादर करावा.

(भाऊराव रामसिंग चव्हाण)
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, यवतमाळ

प्रतिलिपी:-

1. मा. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तलय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, अमरावती यांना माहितीस्तव सविनय सादर
3. प्राचार्य, आपणास कळविण्यात येते की, शिष्यवृत्तीचे /फ्रिशिपचे अर्ज विद्यार्थ्याकडुन भरुन मंजुरीसाठी यासाठी या कार्यालयात त्वरीत ऑनलाईन सादर करण्यात यावेत. तसेच आपल्या महाविद्यालयांना भेटी देणा-या समतादुत /तालुका समन्वयक कर्मचा-यांना आवश्यक ती माहीती देण्यात यावी.
4. समतादुत/ तालुका समन्वयक, जिल्हा यवतमाळ यांना सुचित करण्यात येते की, महाविद्यालयाला भेटी देवून शिष्यवृत्तीचे अर्ज /फ्रिशिपचे अर्ज या कार्यालयात ऑनलाईन सादर करण्याबाबत सुचित करण्यात यावे.

सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, यवतमाळ

महाराष्ट्र शासन
-सामाजिक न्याय विभाग-
कार्यालय सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण यवतमाळ .

E-mail ID :spldswo_yml@rediffmail.com/spldswo.yml@gmail.com Phone & FaNo.07232242035

जा.क्र.सआसक/यवत/वि.नों. माहिती/ 603 /2023-24 दिनांक - 14/02/2024

प्रति,
मा. प्राचार्य,________________
ता. ________________ जि.यवतमाळ

विषय:- प्रवेशित विदयार्थ्यांची नोंदनीची माहिती सादर करण्याबाबत. (शिष्यवृत्ती अर्जाबाबत)

महोदय,

उपरोक्त् विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे माहिती उलट टपाली व कार्यालयास विनाविलंब या कार्यालयास सादर करण्यात यावी. सदर माहिती शासनास तात्काळ सादर करावयाची असल्याने सदर कामास प्रथम प्राधान्य् देण्यात यावे.

अ. क्र	प्रवर्ग	सन 2022-23 मध्ये नोंदणी झालेल्या विदयार्थ्यांची संख्या	सन 2023-24 या वर्षामध्ये नोंदणी अपेक्षित असलेले विदयार्थी संख्या	सन 2023-24 मध्ये नोंदणी झालेले विदयार्थी संख्या	नोंदणीसाठी शिल्लक विदयार्थी	नोंदणी न होण्याची कारणे
1	अनुसूचित जाती	177	183	183		
2	विजाभज	311	319	319		
3	इमावं	96	91	91		
4	विमाप्र	6	4	4		

वरील माहीती शिष्यवृत्ती पोर्टलवर अर्जबाबत देण्यात यावी. 597

590

(भाऊराव रामसिंग चव्हाण)
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, यवतमाळ